**सहकारी सुतगिरण्या व वस्त्रोद्योग प्रकल्प अपारंपरिक उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत. ...**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: धोरण २०१८/प्र.क्र. ४१०/टेक्स-५**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: ३ मे, २०१८

**प्रस्तावना** -

राज्याच्या आर्थिक संरचनेमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. शेती व्यवसायानंतर वस्त्रोद्योग हा राज्यातील महत्वाचा उद्योग आहे. कृषि व्यवसायानंतर या उद्योगामध्ये जास्तीत जास्त रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर केले आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणात सहकारी सुतगिरण्यां तीन वर्षात सौर उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविण्यासाठी महासंचालक महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) व संचालक वस्त्रोद्योग यांची समिती गठीत करण्यात येईल. असे निश्चित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना सूचविण्यासाठी / शासनास शिफारशी सादर करण्यासाठी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ नुसार राज्यातील सहकारी सुतगिरण्यां व अन्य वस्त्रोद्योग अपारंपारिक उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविण्यासाठी उपाययोजना सुचविणे व शिफारशी करणे याकरीता संचालक, वस्त्रोद्योग, याच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्य समाविष्ट असलेली समिती नियुक्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. समितीचे सदस्य :- या समितीचे सदस्य खालीलप्रमाणे असतील:-

| | |
|---|---|
| १. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर | अध्यक्ष |
| २. महासंचालक, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA), | सदस्य |
| ३. संचालक (वाणिज्य), महावितरण कंपनी, | सदस्य |
| ४. सह संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर | सदस्य सचिव |

३. सदर समिती खालील बाबींचा अभ्यास करुन शासनास उपाययोजना व शिफारसी सादर करील. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१) सहकारी सुतगिरण्यां अपारंपारिक उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविणे, अनुदानासाठी पात्रतेचे निकष निश्चित करणे, अंमलबजावणीची रुपरेखा आखणे तसेच प्रशासकीय सुलभतेसाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.

२) सहकारी सुतगिरण्यां वगळता अन्य वस्त्रोद्योग प्रकल्प अपारंपारिक उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविणे, अनुदानासाठी पात्रतेचे निकष निश्चित करणे, अंमलबजावणीची रुपरेखा आखणे तसेच प्रशासकीय सुलभतेसाठी आवश्यक उपाययोजना सुचविणे.

४. समिती आवश्यकतेनुसार वस्त्रोद्योग क्षेत्रातील उद्योजक, तज्ञ व्यक्ती, वस्त्रोद्योग क्षेत्राशी संबंधित संघटना, अपारंपारिक उर्जेशी संबंधित संघटना / कंपन्या /तज्ञ यांचेशी चर्चा करील व आवश्यकते नुसार समितीच्या बैठकीस निमंत्रित करील.

५. सदर समिती त्यांचा अहवाल दोन महिन्याच्या आत शासनास सादर करील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५०३१५०३०३६१०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.05.03 15:05:21 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति:-**

१. मा.मंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (उर्जा), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
४. अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव (उर्जा), उद्योग,उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. सचिव(वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
८. संचालक, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
९. सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
१०.उप सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
११.महासंचालक, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA)
१२.संचालक (वाणिज्य), महावितरण कंपनी, मुंबई
१३.सह संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर
१४. अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, टेक्स-१-अ /टेक्स-१
१५.निवड नस्ती (टेक्स-५)